दाखल दिनांक : ०१/०९/२०२१
नोंदणी दिनांक : ०१/०९/२०२१
निकाल दिनांक : १९/१०/२०२३
कालावधी : वर्षे महिने दिवस
०२ ०१ १८

**सावंतवाडी येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांच्या न्यायालयात**
**ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग**
**(पीठासीन अधिकारी – श्रीमती आर. जी. कुंभार )**
**(अधिघोषित दिनांक १९/१०/२०२३)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ३०५/२०२१**
**निशाणी क्र. ०९ लगत.**

प्रथम खबर अहवाल गुन्हा क्रमांक– सी ५४/२०१९
राज्य उत्पादन शुल्क तपासणी नाका, इन्सुली.

| | |
|---|---|
| फिर्यादी | महाराष्ट्र शासन तर्फे निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, तपासणी नाका, इन्सुली, जि. सिंधुदुर्ग. |
| अभियोग पक्षातर्फे विशेष सरकारी अभियोक्ता | सौ. डी. व्ही. गोवेकर |
| आरोपी | १. शाम सावळाराम पेडणेकर<br>वय २१ वर्षे, धंदा–शेती<br>२. श्रवण हरिश्चंद्र पारसेकर<br>वय २१ वर्षे, धंदा–शेती,<br>दोघे रा. पिंगुळी, भुपकरवाडी,<br>ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग. |
| आरोपीतर्फे विधिज्ञ | श्री. ए. जी. जाधव |

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | २५/०७/२०१९ |
| पहिली खबर दिनांक | २५/०७/२०१९ |
| दोषारोपपत्राचा दिनांक | ०१/०९/२०२१ |

| | |
|---|---|
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | १९/०१/२०२२ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०५/०८/२०२३ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक | -- |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | १९/१०/२०२३ |
| शिक्षा दिल्याची तारीख, आदेश | निर्दोष मुक्तता |

**<u>आरोपीचा तपशील</u>**

| आरोपीची श्रेणी | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | अधिनियम | निदोष मुक्त केले किंवा शिक्षा दिली | आरोपीस दिलेली शिक्षा | सुनावणीदरम्यान जेलमध्ये असल्याचा कालावधी कलम ४२८ सी.आर.पी.सी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | १. शाम सावळाराम पेडणेकर<br>२. श्रवण हरिश्चंद्र पारसेकर | -- | १९/०१/२०२२ | महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५(अ)(ई),८१, ८३,१०८ अन्वये | निर्दोष मुक्त केले. | निरंक | निरंक |

**-:: <u>न्या य नि र्ण य</u> ::-**

**( <u>दिनांक १९ ऑक्टोबर २०२३ रोजी घोषीत</u>.)**

अभियोग पक्षाने आरोपी क्र. १ व २ विरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५(अ),(ई), ८१, ८३ व १०८ नुसार खटला चालविण्यात आला आहे.

०२. आरोपींची नि.९ येथे संक्षिप्त संपरिक्षा नोंदविली, आरोपींनी गुन्हा अमान्य केला व अभियोग चालविण्याची विनंती केली.

०३. आरोपी क्र.१ व २ यांचेवर ठेवण्यात आलेले दोषारोप यावरुन खालील मुद्दे माझ्यासमोर उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढील प्रमाणे देण्यात आले आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | दिनांक २५/०७/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजताच्या सुमारास मौजे बांदा, राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ वर पंजाबी खालसा ढाब्यासमोर ता. सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग येथे आरोपी क्र. १ व २ यांनी त्यांच्या ताब्यातील दुचाकी वाहन क्र. एम.एच.०७-ए.के.-२२६४ वरुन एका प्लास्टीक गोणपाटातून गोवा बनावटीच्या मॅकडॉल नं.१ व्हीस्कीच्या प्रत्येकी १८० मिली मापाच्या ९६ बाटल्या, हायवर्ड व्हीस्कीच्या प्रत्येकी १८० मिली मापाच्या १४४ बाटल्या व डीएसपी ब्लॅक व्हीस्कीच्या प्रत्येकी ७५० मिली मापाच्या ०६ बाटल्या दारुचा मुद्देमाल विनापरवाना बिगरपरवाना विक्री करण्याच्या उद्देशाने त्यांच्या जवळ बाळगून वाहतुक करीत असताना व त्याअनुषंगाने महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कायदा कलम ६५(अ), (ई), ८१, ८३ व १०८ नुसार गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले काय? | **नाही.** |
| **२.** | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

**-:: <u>का र ण मि मां सा</u> ::-**

०४. आरोपी क्र. १ व २ विरुध्द अपराध सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने एकूण २ साक्षीदार तपासले. त्यानंतर आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वये निवेदन नोंदविण्यात आले. आरोपींनी अभियोग पक्षाचा संपूर्ण पुरावा नाकारला आहे.

**अ. अभियोग**

| **श्रेणी** | **नांव** | **पुराव्याचे स्वरुप(प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार)** |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | शरद मनाहेर साळुंखे | फिर्यादी |
| अ.सा.क्र.२ | आशिष राजाराम सामंत | पंच |

**ब. बचाव साक्षीदार, इतर**

| **श्रेणी** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप(प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार)** |
|---|---|---|
| | | |

| | | |
|---|---|---|
| डि.सा.क्र.१ | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन साक्षीदार, इतर**

| **श्रेणी** | **नांव** | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| सी.सा.क्र.१ | निरंक | निरंक |

**अभियोग पक्षाचे/ बचाव /कोर्ट निशाणी**

**अ. अभियोग**

| **अनु.क्र.** | **निशाणी क्र.** | **तपशील** |
|---|---|---|
| १ | नि.१८-सा.क्र.१ | फिर्याद |
| २ | नि.१९- सा.क्र.२ | जप्ती पंचनामेवरील सही |

**ब.बचाव**

| **अनु.क्र.** | **निशाणी क्र.** | **तपशील** |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन निशाणी**

| **अनु.क्र.** | **निशाणी क्र.** | **तपशील** |
|---|---|---|
| १ | नि.२० | न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळा यांचेकडील रासायनिक पृथःकरण अहवाल |

**ड.मुद्देमाल**

| **अनु.क्र.** | **मुद्देमाल क्र.** | **तपशील** |
|---|---|---|
| १ | १ | गोवा बनावटीच्या मॅकडॉल नं.१ व्हीस्कीच्या प्रत्येकी १८० मिली मापाच्या ९६ बाटल्या |
| २ | २ | गोवा बनावटीच्या हायवर्ड व्हीस्कीच्या प्रत्येकी १८० मिली मापाच्या १४४ बाटल्या |
| ३ | ३ | गोवा बनावटीच्या डीएसपी ब्लॅक व्हीस्कीच्या प्रत्येकी ७५० मिली मापाच्या ०६ बाटल्या |
| ४ | ४ | एक काळ्या रंगाची हिरो होंडा स्लेंडर प्लस मोटरसायकल क्र. एम.एच.०७-ए.के.-२२६४ |

| | | |
|---|---|---|
| ५ | ५ | दोन सिमकार्ड असलेला एक काळया रंगाचा टेकनो कंपनीचा ॲन्डरॉईड मोबाईल |
| ६ | ६ | दोन सिमकार्ड असलेला एक एम.आय कंपनीचा ॲन्डरॉईड मोबाईल |

०५. अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकिल श्रीमती डी. व्ही. गोवेकर आणि आरोपी क्र. १ व २ तर्फे विद्वान वकील श्री. ए. जी. जाधव यांचा युक्तीवाद ऐकला.

**<u>मुद्दा क्र. १ बाबतः</u>**–

०६. अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे दि.२५/०७/२०१९ रोजी निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, तपासणी नाका, इन्सुली यांना गोवा ते सावंतवाडी या रस्त्यावर गोवा बनावटीच्या दारुची बेकायदेशीर वाहतुक चालू आहे अशी बातमी मिळाली होती त्याअनुषंगाने खबर देणार, दोन पंच व इतर कर्मचारी असे सर्वजण राष्ट्रीय महामार्गावर शासकीय वाहनाने गस्त घालत असताना तसेच वाहनांची तपासणी करीत असताना मौजे बांदा, पंजाबी खालसा ढाबा समोर बांदयाहून सावंतवाडीच्या दिशेने एक दुचाकी येताना दिसून आली होती. त्यावेळी सदर वाहनावर आरोपी क्र.१ व २ हे बसले होते आणि त्याच्या मध्ये एक जड वस्तूने भरलेली पांढऱ्या रंगाची गोणी होती. त्यांचा संशय आल्याने निरीक्षक साहेबांनी दोन पंचासमक्ष तपासणी केली असता त्याच्याकडील गोणीमध्ये गोवा बनावटीच्या मॅकडॉल नं.१ कंपनीच्या प्रत्येकी १८० मिली मापाच्या ९६ बाटल्या, हायवर्ड व्हीस्कीच्या प्रत्येकी १८० मिली मापाच्या १४४ बाटल्या व डीएसपी ब्लॅक कंपनीच्या प्रत्येकी ७५० मिली मापाच्या ०६ बाटल्या मिळून आल्या होत्या. त्याप्रमाणे साक्षीदार क्र.१ यांनी पंचांसहीत घटनास्थळावर आरोपींना पकडून त्यांच्या जवळील मालाचा जप्ती पंचनामा केला. सबब, साक्षीदार क्र.१ यांनी सांगितल्याप्रमाणे साक्षीदार क्र.२ यांना सोबत घेवून पंचनामा केल्याबाबतचे कथन साक्षीदार क्र.२ यांनी नाकारले आहे.

०७. प्रस्तुत केसमधील फिर्याद साक्षीदार क्र.१ यांनी शाबीत केली आहे. तसेच ते स्वतः जप्त मुद्देमालापैकी नमुना बाटली सी.ए. रिपोर्टसाठी घेऊन गेल्याचे कथन करीत आहेत.

त्यांनी दि. २३/०९/२०१९ रोजी नमुना बाटली न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा, कोल्हापूर येथे जावून जमा करुन त्याबाबतची पोहोच (नि.१८) याकामी दाखल केली आहे. तसेच सदर साक्षीदार न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळेमध्ये जाण्याकरीता कार्यालयातील रजिस्टरवरील नोंदीचा उतारा अथवा त्या अनुषंगाने कागदोपत्री पुरावा प्रस्तुत कामी दाखल केला गेलेला नाही. तसेच सदर साक्षीदार हा कोणत्या वाहनाने गेला त्याबाबत वारंट अथवा तिकीट देखील अभिलेखावर दाखल केलेले नाही. त्यामुळे सदर साक्षीदार हा नेमका कोणता मुद्देमाल घेऊन न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळेमध्ये गेला याबाबत स्पष्ट होत नाही व मुद्देमालाबाबत संशय निर्माण होतो. त्यामुळे घटनेतील जप्त मुद्देमाल हा निशाणी क्र.२० कडील सी.ए. रिपोर्टमधील भाग आहे हे निःसंशयपणे शाबीत होत नाही. तसेच प्रस्तुत खटल्यातील सा.क्र.२ यांनी पंचनामा त्यांचे समक्ष केलेबाबतचे कथन नाकारले आहे. त्यामुळे आरोपीच्या ताब्यातून जप्त मुद्देमाल दारु जप्त केल्याचे निःसंशयपणे शाबीत होत नाही.

०८. प्रस्तुत कामातील पंच अभियोग पक्षास सहाय्यभूत ठरले नाही. साक्षीदार क्र.१ यांची साक्ष आरोपींविरूध्द गुन्हा शाबीत करणेस अपुरी आहे. सबब, आरोपींविरूध्द अभिलेखावर सबळ पुरावा आणणेस अभियोग पक्ष असमर्थ ठरला आहे. त्यामुळे आरोपी क्र. १ व २ हे गोवा बनावटीची दारू त्यांच्या ताब्यात बाळगून त्याची वाहतुक करीत असताना मिळून आल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नाही. तसेच पंच साक्षीदाराने अभियोग पक्षाला सहकार्य केलेले नाही. अभियोग पक्षाने प्रस्तुतचे प्रकरण संशयापलीकडे जावून सिध्द केलेले नाही. त्यामुळे आरोपींविरुध्द ठेवण्यात आलेले महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५(अ),(ई), ८१, ८३ व १०८ खालील आरोप निःसंशयपणे सिध्द होत नाहीत. करीत मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करिताः-</u>**

०९. वरील मुद्दा क्र.१ च्या सविस्तर चर्चेअंती अभियोग पक्षाने आरोपींविरुध्द महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम ६५(अ),(ई), ८१, ८३ व १०८ प्रमाणे कोणताही गुन्हा शाबीत केलेला

नाही व तसा कोणताही पुरावा अभिलेखावर आणलेला नाही. त्यामुळे आरोपी क्र. १ व २ हे सदर गुन्ह्यातून निर्दोष मुक्त होणेस पात्र आहेत. वरील सर्व मुद्दयांच्या निष्कर्षार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**-:: आदेश ::-**

**१.** आरोपी क्र.१ शाम सावळाराम पेडणेकर व आरोपी क्र.२ श्रवण हरिश्चंद्र पारसेकर दोघे रा. पिंगळी, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) नुसार महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५(अ),(ई), ८१, ८३ व १०८ या अपराधातून संशयाचा फायदा देऊन मुक्त करण्यात येते.

**२.** आरोपींचे जामीन बंधपत्र व जात मुचलका रद्द करण्यात येत आहेत.

**३.** अपिल कालावधीनंतर, दोषारोपपत्रामध्ये नमुद अ.क्र. १ ते ३ कडील दारुचा मुद्देमाल नष्ट केला नसलेस अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सिंधुदुर्ग यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविणेत यावा.

**४.** प्रस्तुत खटल्यामधील दोषारोपामध्ये नमुद अ.क्र.४ कडील काळया रंगाची हिरो होंडा कंपनीची स्लेंडर दुचाकी क्र.एम.एच.०७-ए.के.-२२६४ हे वाहन आदेशान्वये सुपुर्दनाम्याद्वारे मूळ मालकाचे ताब्यात देण्यात आली आहे व त्याप्रमाणे अंतरीम ताबा अंतिम करणेत येत आहे.

**५.** प्रस्तुत खटल्यामधील दोषारोपामध्ये नमुद अ.क्र.५ कडील टेकनो कंपनीचा मोबाईल व अ.क्र.६ कडील एम.आय कंपनीचा मोबाईल आदेशान्वये सुपुर्दनाम्याद्वारे मूळ मालकाचे ताब्यात देण्यात आले आहेत व त्याप्रमाणे अंतरीम ताबा अंतिम करणेत येत आहे.

**६.** आरोपी क्र.१ व २ यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) नुसार प्रत्येकी रु.१५,०००/- चा वैयक्तीक बंधपत्र न्यायालयात सादर करावे.

(न्यायासनावर निवेदीत आणि अधिघोषीत.)

RANJANA GOVIND KUMBHAR
Digitally signed by RANJANA GOVIND KUMBHAR
Date: 2023.10.19 17:50:50 +0530

स्थळ-सावंतवाडी
दिनांकः- १९/१०/२०२३.

(श्रीमती आर. जी. कुंभार)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
सावंतवाडी.

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this PDF file Judgment / Order are same word to word, as per the original Judgment / Order.

| | | |
|---|---|---|
| Court | : | Jt.C.J.J.D. & J.M.F.C. Sawantwadi |
| Name of Stenographer | : | U. B. Hundekar |
| Date Judgment /order signed by the Presiding Officer on | : | 19/10/2023 |
| Judgment / order uploaded on | : | 19/10/2023 |